MHLA1500 ०८४६२०२५

**दिवाणी किरकोळ अर्ज नं.२५४/२०२५**
**निशाणी १ खालील आदेश**

**राजीव पि. प्रभाकर भालेराव ---- अर्जदार**

**- विरुध्द -**

**कोणीही नाही. ---- सामनेवाला**

**आदेश निशाणी ०१ वर**

**१.** अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ नियम २ प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदारच्या अभिकथनाप्रमाणे, अर्जदार यांचे वडील नामे कै प्रभाकर पि. सोपान भालेराव रा. अजनसोंडा बु., ता. चाकूर, जि. लातूर हे दि. २७/०५/२०२३ मौजे अजनसोंडा बु., ता. चाकूर, जि. लातूर येथे मयत झाले आहेत. त्यामुळे त्यांच्या मृत्यूची नोंद ग्राम पंचायत अजनसोंडा बु., ता.चकूर जि. लातूर येथे झाली आहे. मयताची आई यापूर्वीच मयत आहेत. त्यांच्या पश्यात अर्जदार व सदर अर्जातील कॉलम नं. ३ मधील नमूद वारसदार आहेत. अर्जदार व ईतर वारसांना सदरचे वारसाचे प्रमाणपत्र हे औपचारीक कामाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक आहे.

**३.** अर्ज व अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार तर्फे विधीज्ञ श्री. डि. आर. हाक्के यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूत अर्जाचे निर्गतीकरीता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाल्यामुळे त्यांच्या कारणामीमांसेसह त्याचे उत्तर खालीलप्रमाणे नमुद करत आहे.

| अनु. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळणेस पात्र आहेत का ? | होय |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत –**

**४.** अर्जदार यांनी आपल्या अर्जातील कथनांना पुष्ठी देण्यासाठी कै. प्रभाकर पि. सोपान भालेराव यांचा मृत्युदाखल्याची साक्षांकीत प्रत (नि.०६) वर दाखल केली आहे. अर्जदार व इतर वारस यांच्या आधारकार्डाची साक्षांकीत प्रत ( नि.क्र.१२ ते १८) वर तसेच रेशनकार्डची साक्षांकीत प्रत ( नि.क्र.१९ )वर दाखल केले आहेत.

**५.** अर्जदारांच्या मागणीप्रमाणे दि. ३०/०८/२०२५ रोजी "पुण्य नगरी" लातूर आवृत्ती मधील जाहिर नोटीस (नि.११) काढण्यात आली. ( नि. क्र.८ ) नुसार जाहिरनामा मयत कै. प्रभाकर पि. सोपान भालेराव यांच्या घराजवळ, गावात प्रसिध्द ठिकाणी, गावचावडी समोर जाहीर करण्यात आला आहे. या जाहिरनाम्याच्या व जाहिर नोटीसीच्या प्रसिध्दीनंतर देखील अर्जदार हे कै. प्रभाकर पि. सोपान भालेराव यांचे वारस नाहीत अशी तक्रार कुणीही विहीत कालावधीमध्ये आजतागायत उपस्थित केलेली नाही.

**६.** अर्जदार यांनी याकामी अर्जदार व अर्जातील परीच्छेद क्र.३ मधील सर्व इतर वारस यांच्या तर्फे अर्जदार यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (नि.२०) दाखल केलेले आहे. सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा अर्जातील कथने व दाखल कागदपत्रे यांचेशी पूर्णपणे सुसंगत आहे. थोडक्यात, अर्जदार यांच्या या अर्जातील कथनांना कोणीही आव्हानीत केलेले नाही. अर्जदार हे मयत कै. प्रभाकर पि. सोपान भालेराव यांचा मुलगा असुन अर्जातील परीच्छेद क्र.३ मधील इतर वारस क्र.१ ही मयताची पत्नी, इतर वारस क्र.२ ते ६ हे मयताचे मुले व

मुली आहेत. आणि कै. प्रभाकर पि. सोपान भालेराव हे हिंदू असल्याची बाब वादातीत नाही. हिंदू वारसा कायदा १९५६ च्या परिशिष्टाप्रमाणे अर्जदार हे मयत कै. प्रभाकर पि. सोपान भालेराव यांचे वर्ग–१ वारस ठरतात.

७. नियम ३, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार घोषणापत्रक/जाहीरनाम्यात उल्लेख केलेली मुदत संपेल त्यावेळी, पुरेशी होईल अशी कोणतीही हरकत घेण्यात आली नसेल तर, न्यायालयाने दावा सांगणाऱ्या इसमाच्या हक्कासंबंधी देण्यात येईल तो पुरावा ताबडतोब स्वीकारला पाहिजे आणि त्याची खात्री झाली तर, तो इसम मृत इसमाचा मान्यता दिलेला वारस असल्याचे जाहिर करणारे प्रमाणपत्र त्यास दिले पाहिजे. प्रस्तुत प्रकरणामध्ये ज्या अर्थी जाहिरनामा दि.०२/०९/२०२५ रोजी प्रसिध्द झाल्यानंतर व जाहिर नोटीस दि. ३०/०८/२०२५ रोजी प्रसिध्द झाल्यानंतर आजपर्यंत अर्जदारांची मागणी खोडून काढण्यासाठी कोणीही काही तक्रार अथवा म्हणणे सादर केले नाही.

८. अभिलेखावरील नि.०६ मृत्यू दाखला याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, कै. प्रभाकर पि. सोपान भालेराव यांचा मृत्यू दि. २७/०५/२०२३ रोजी अजनसोंडा बु. ता. चाकूर जि. लातूर येथे झाला. मृत्यूचे समयी मयत व्यक्तीचा पत्ता अजनसोंडा बु., ता. चाकूर जि. लातूर या जिल्ह्यामधील आहे त्यामुळे सदरचा अर्ज या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे. कै. प्रभाकर पि. सोपान भालेराव यांचा मृत्यु दि. २७/०५/२०२३ रोजी मयत झाल्याचे नि.०६ वरील मृत्यू दाखल्यावरुन सिध्द होते.

९. अभिलेखावरील कागदपत्रे व तोंडी पुरावा याचे अवलोकन केले असता व अर्जदार यांचा अर्ज कोणीही आव्हान दिलेला नसताना, अर्जदार तसेच अर्जातील परीच्छेद क्र.३ मधील इतर वारस हे कै. प्रभाकर पि. सोपान भालेराव यांचे कायदेशीर वारस असल्याची बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते. त्यामुळे अर्जदार तसेच अर्जातील परीच्छेद क्र.३ मधील इतर वारस हे मयत कै. प्रभाकर पि. सोपान भालेराव यांचे वारस आहेत हे जाहिर करणे व अर्जदारांना वारसा दाखला प्रमाणपत्र देणे हे न्यायोचित ठरते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.३ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार आणि अर्जातील परीच्छेद क्र.३ मधील इतर वारस हे कै. प्रभाकर पि. सोपान भालेराव यांचे वारस आहेत असा वारसा दाखला (Heirship Certificate) त्यांना त्यांनी योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यावर प्रदान करणेत यावा.

३. अर्जदार यांनी सिव्हील मॅन्युअलचे परिच्छेद ३१२ च्या तरतुदीप्रमाणे **कै. प्रभाकर पि. सोपान भालेराव** याचे नावावरील सर्व मालमत्तांची यादी दाखल करावी.

४. अर्जदार यांनी परिच्छेद ३०६ सिव्हील मॅन्युअल प्रमाणे, सदरचे वारसा प्रमाणपत्र हे कोणत्याही चुकीच्या कामासाठी वापरले जाणार नाही असे क्षमापुर्ती बंधपत्र दाखल करावे.

५. सदरचे वारसा प्रमाणपत्र हे कोणत्याही प्रकारचा हक्क/शिर्षक अर्जदाराच्या बाजूने जाहिर करत नाही आणि सदरचे प्रमाणपत्र असे जाहिर करते की, अर्जदार तसेच अर्जातील परीच्छेद क्र.३ मधील इतर वारस हे कायद्याने कै. प्रभाकर पि. सोपान भालेराव यांचे वारस आहेत.

६. ही बाब स्पष्ट करण्यात येते की, सदरचा अर्ज हा अर्जदार तसेय अर्जातील परीच्छेद क्र.३ मधील इतर वारस हे मयत कै. प्रभाकर पि. सोपान भालेराव यांचे मृत्युपत्र व्यवस्थापक अथवा प्रबंधक म्हणून जाहिर करण्यात आलेला नाही. त्यामुळे कोर्ट फी बद्दल कोणताही निर्णय देण्यात आलेला नाही. सदरच्या आदेशाचा कोणत्याही फेरफार अथवा मयताच्या मालमत्तेला नाव लावण्यासाठी वापर करण्यात येऊ नये.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत)

DIVYA Digitally signed by DIVYA Date: 2026.03.27 16:54:10 +0530

**(दिव्या सारंग करभाजन)**
**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, चाकूर**

**दिनांक : २३/०३/२०२६.**

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order are same, word to word, as per the original judgment/order;

| | | |
|---|---|---|
| Name of the Jr. Clerk | : | Abhijit Dipak Sutrave |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Chakur |
| Date of judgment/order | : | 23/03/2026 |
| Date of Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 23/03/2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 23/03/2026 |